■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २७४ ■ रविवार दि.२२ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 274 ■ Sunday Dt.22 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# अबब.. आता तर चकलांबा पोलिसांनी हद्दच पार केली, एक हायवाला एका नाईटचा बारा हजार रुपये प्रमाणे रेट?

# खाकी वर्दीला कलंक लावणाऱ्या चकलांब्याच्या पोलीस निरीक्षकाला एसपी नवनीत कॉवत धडा शिकवणार का?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




# पोलीस निरीक्षक संदीप पाटील साहेब, वाळूपट्टा घरची जागीर असल्याप्रमाणे वागू नका?

## चकलांबा पोलिसांना काळ्या सोन्यांच्या उपशातून लाखो रुपयांचा मलिदा खाण्याचा मोह आवरणार कधी?

## दोन पोलीस कर्मचारी वाळू माफियांकडून हप्ता गोळा करण्यासाठी गोदापत्रात सक्षम?

## एसपी साहेब, चकलांबा पोलीस प्रशासनाच्या हप्तेखोरीमुळे जिल्ह्यातील खाकी बदनाम?




गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन येथून जाणाऱ्या गोदावरी नदी पत्रातून केनीच्या साह्याने वाळूचा बेसुमार उपसा करून हायवा तसेच ट्रॅक्टर द्वारे बिनबोभाट ओव्हरलोड वाहतूक करत असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. याकडे संबंधित चकलांबा पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. एक हायवाला एका नाईटचा बारा हजार रुपये प्रमाणे तसेच एका ट्रॅक्टरला सात हजार रुपये प्रमाणे चकलांबा पोलिसांचा रेट असल्याची माहिती मिळत आहे. राक्षसभूवन



गोदापत्रातून अवैधरित्या बेसुमार वाळू उपसा सुरू असून, पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे डोळे असून आंधळ्याची भुमिका घेऊन गप्प का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यामुळे वाळू माफिया जोमात तर संबंधित चकलांबा पोलीस प्रशासन कोमात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. याकडे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्वत: लक्ष घालणे गरजेचे आहे. नसता गोदापात्राची चाळण झाल्याशिवाय राहणार नाही. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे लक्ष घालून कारवाई करणार का? आणि काय कारवाई करणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. शिवाय आतापर्यंत अवैध वाळू प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवालची तपासणी केली पाहिजे, चकलांबा पोलिसांकडून फक्त अवैध वाळूच्या ट्रॅक्टरवर कारवाई केली जात असून, हायावांवर का करत नाही असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

तसेच पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी ठेवलेल्या रेट प्रमाणे हप्ता गोळा करण्यासाठी दोन पोलीस कर्मचारी गोदापात्रात राजरोजपणे

पान २ वर

### पत्रकारांची एलर्जी असलेल्या संदीप पाटलांनी पत्रकारांना व्हाट्सअपला केले ब्लॉक?

पोलीस कर्मचाऱ्याने व पोलीस निरीक्षकांनी पत्रकाराचा फोन उचलणे अपेक्षित आहे. जर तो फोन उचलत नसेल, तर त्याबद्दल लेखी तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करता येते. तसेच, प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाकडेही तक्रार दाखल करता येत आहे. पोलीस कर्मचाऱ्यांनी व पोलीस निरीक्षकांनी पत्रकारांचा नंबर व्हाट्सअपला ब्लॉक केल्याची घटना समोर आली आहे. हे प्रकरण गंभीर असून, यामुळे पत्रकारांना माहिती मिळवण्यात आणि बातम्या कव्हर करण्यात अडचणी येऊ शकतात. काही दिवसांपूर्वी, दैनिक महाराष्ट्र आरंभचे उपसंपादक यांनी संदीप पाटील यांना व्हाट्सअप वरुन काही माहिती देण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्याकडून व्हाट्सअपला ब्लॉक करण्यात आले असे दिसून आले. पोलिसांकडून पत्रकारांचा नंबर ब्लॉक करणे, हे योग्य नाही, असे मत आहे. या घटनेमुळे पत्रकारांमध्ये नाराजी आहे.

### दुसऱ्यांनी केलेल्या कारवाईत श्रेय घेण्यास चकलांबा ठाणे प्रमुख एक्स्पर्ट?

इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी केलेल्या कारवाईबाबत पोलीस निरीक्षक संदीप पाटील कोणत्याही कारवाई बाबतीत कारवाईचे श्रेय घेण्यासाठी पुढे नेहमीच असतात. एखाद्या गुन्ह्याचा तपास किंवा कारवाई यशस्वी झाल्यावर त्यांचे श्रेय घेण्यासाठी पोलीस निरीक्षक संदीप खरे ठरले, यामुळे कधीकधी, कारवाईत खऱ्या अर्थाने योगदान नसतानाही हे पोलीस निरीक्षक श्रेय घेण्याचा प्रयत्न करतात. ज्यामुळे गैरसमज निर्माण होऊ लागले आहेत. इतर पोलिसांनी एखाद्या मोठ्या गुन्हेगाराला पकडले. आता, त्या कारवाईत ज्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला, त्यांना श्रेय देणे स्वाभाविक आहे. परंतु, ज्यांनी फक्त कारवाईच्या ठिकाणी उपस्थित राहून किंवा इतर कोणतेही महत्त्वाचे काम न करता श्रेय घेण्याचा प्रयत्न केला. आणि श्रेय मिळवल्याने संदीप पाटील यांना असे वाटते की, आपल्याला लोकप्रियता मिळेल या आशेवर त्या आयत्या पिठावर रेगुड्या ओढत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांचे कौतुक होऊ शकते, तसेच बढती मिळण्याची संधी देखील मिळू शकते. त्यामुळे पाटील यांच्या मनात मन मे लड्डू फुटे असे चालले आहे.

# वकिलाकडून महिलेला मारहाण?

### ॲड. राम केरबा गवते व यांच्या कुटुंबातील व्यक्तीने दगडू रामभाऊ आवळे यांच्या पत्नी व सुनेस बांबूची काठी व लोखंडी पाईपने मारहाण

### मी वकील आहे माझे कोणी काहीच करू शकत नाही असे म्हणत आवळे कुटुंबास जातीय शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी

### न्याय देणाऱ्या कडूनच अनुसूचित जाती जमातीच्या महिलेंवर अन्याय

बीड । प्रतिनिधी



अतिशय गरीब कुटुंबातील माजलगाव तालुक्यातील गोविंदपुर येथील दगडू रामाभाऊ आवळे हे आपल्या गावी शेतमजुरी व आपली शेती करत आहेत. मुलगा रामेश्वर दगडू आवळे माजलगाव येथे एका हार्डवेअर दुकानावरती काम करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत. तर गावातील असलेले वकील राम केरबा गवतेयाने यापूर्वी देखील रामेश्वर आवळे व त्यांचे मित्र प्रवीण गवते यांना मारहाण केली होती परंतु यात काही दिवस जातात पुन्हा एकदा प्रवीण गवते यांचे आई सरपंच असल्याने राजकारणाचा विषय डोक्यात घेऊन प्रवीण गवते यांच्यासोबत का राहतो हा राग डोक्यात घेत हा कट रचत रामेश्वर आवळे व प्रवीण गवते त्यांच्यावरती प्राण घातक हल्ला करण्याचा प्रयत्न करत आहे.

तसेच काल दि.१९ वार गुरुवार रोजी तेलगाव येथून आपल्या गावाकडे जाता वेळेस वकील रामा गवते यांनी प्रवीण गवते रामेश्वर आवळे गाडीवरून येत असताना त्यांना एक ते दोन वेळेस कट मारून त्यांच्यावर दगडफेक केली. यात चालक रामेश्वर आवळे यांच्या हाताला मार लागला. तर हे आवळे व गवते उपचार घेण्यासाठी माजलगाव येथे थांबले असता रामा गवते यांनी पुन्हा झालेल्या वादातून आपल्या गावी आल्यानंतर गावातील आपल्या कुटुंबातील भाग्यत्राबाई केरबा गवते, लखन केरबा गवते, आप्पासाहेब इंद्रजित गवते, ठकाराम सुखदेव गायकवाड, बुवाजी विलास गवते यांना सोबत घेऊन

पान २ वर

# गैबीनगर तांडा येथे जुगार क्लबवर स्था.गु.शाखेचा छापा

### ०८ लाख ९२ हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन सात इसमाविरुध्द केला गुन्हा दाखल



बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक, बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक २०/०६/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे चकलंबा हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, मौजे गैबीनगर तांडा ता.गेवराई येथे काही इसम बी.एस.एन.एल टॉवरचे समोरील इसम नामे संभाजी नाटकर यांचे ऊसाचे शेतातील पत्र्याचे

पान २ वर

## वेलडन एपीआय दराडे सिंघम कारवाई करत माफियांचे कबरडे मोडीत काढले माफियांमध्ये एपीआय दराडे नावाची दहशत वाढली

# एपीआय दराडेनी मुरुमाची चोरटी, वाहतूक करणारे चार हायवा पकडले

बीड । प्रतिनिधी



शनिवार रात्री नगर रोडवर रात्री कारवाई करुन मुरुमाची चोरटी वाहतूक करणारे चार हायवा पकडण्यात आले असून, या चारही चालकांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई बीड ग्रामीण पोलिसांनी केली आहे. बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सपोनि बाळराजे दराडे हे कर्मचाऱ्यांसह शनिवारी रात्री गस्तीवर होते.

यावेळी त्यांना गुप्त खबऱ्या कडून माहिती मिळाली की, नगर रोडवरुन काही हायवा मुरुमाची चोरटी वाहतूक करीत आहेत. ही माहिती मिळताच सपोनि बाळराजे दराडे यांनी नगर रोडवर जिओ पेट्रोल पंप येथे सापळा लावला असता येथून जाणारे हाय थांबवून चौकशी केली असता त्यामध्ये मुरुम आढळून आले. त्यामध्ये चक-१६-उउ-७१३५ चालक संजय सुरेश चितळकर रा. बागिपंपळगांव ता. गेवराई हा पकडला व त्याचे समोर चालत असलेल्या दोन हायवा क्र. चक-२३--ण-१७४१ चालक अक्रम आयुब पठाण, रा चांदीदली मुंबई, चक-२३--ण-२७८५ चालक सतीश नामदेव सौंदरमल रा. बागिपंपळगाव ता. गेवराई, तर चौथा हायवा चक-२३ -ङ - ०११ चालक ऋषीकेश केंगर रा. मुर्शेदपूर ता.जि. बीड हा मुरुम खाली करुन पळून जाताना पोलिसांनी पाठलाग करुन पकडला आहे. हे चारही हाय ताब्यात घेऊन ग्रामीण पोलीस ठाण्यात लावण्यात आले असून,

पान २ वर

# योगाने मानसिक समाधान मिळायला मदत होते : सौ. गिता भाभी पवार

## महिलांना तीन वर्षांपासून योगाचे धडे

गेवराई । प्रतिनिधी

धावपळीच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी शारिरीक, मानसिकदृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. योगाच्या बळावर महिलांचे आरोग्य संतुलित राहते. म्हणून, योग महिलांसाठी काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिजामाता योगा ग्रुपच्या संचालिका सौ. गिता भाभी पवार यांनी बोलताना केले. शनिवार ता. २१ रोजी सकाळी पाच ते सात , या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या जागतिक योगा दिनाच्या निमित्ताने त्या बोलत होत्या.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, २१ जून जागतिक योग दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो. त्या पार्श्वभूमीवर, जिजामाता योग ग्रुपच्या वतीने गेवराई येथील गजानन मंगल कार्यालयातील भव्य सभागृहात सकाळी पाच ते सात, या वेळेत योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी, बोलताना सौ. गिता भाभी पवार म्हणाल्या की, धावपळीचे आयुष्य झाले आहे. काळानुरूप बदल झाल्याने, माणसांचे आयुष्य घडाळाच्या काट्यावर पळते आहे. धावपळीत आरोग्याकडे दूर्लक्ष होते. त्याचे दुष्परिणाम होतात. महिलांचे आरोग्य खूप महत्त्वाचे असून, त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. चांगल्या आरोग्यासाठी योगा महत्त्वाचा आहे. महिलांचे मानसिक, शारीरिक, भावनिक आरोग्य व्यवस्थित ठेवायचे असेल तर, महिलांनी आपल्या आरोग्यासाठी वेळ दिलाच पाहिजे. आरोग्याच्या बाबतीत तडजोड करू नका. त्यासाठी, नियमित व्यायाम, योगा आवश्यक आहे. जिजामाता योगा ग्रुपच्या माध्यमातून आम्ही सगळ्या महिला, तीन वर्षांपासून नियमित योगा करीत आहोत. आम्ही एकत्र आल्याने, विचाराची देवाणघेवाण झाली. बचत गटा सारखी आत्मनिर्भर चळवळ उभी करता आली. हे सामुहिक यश आहे. या व्यासपीठावर विविध सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेता आला. महिलांची आरोग्य तपासणी, सहली, सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासून काम करण्याची आम्हाला संधी मिळाली आहे. महिलांनी एकत्र येऊन योगा ग्रुप तयार करावेत, त्या माध्यमातून बचत गट स्थापन करावेत. योगा मुळे महिलांचे आरोग्य चांगले राहते. त्या शिवाय, स्वावलंबनाचा मार्ग आयुष्यात अंत्यत गरजेचा असल्याचे ही, सौ. पवार यांनी शेवटी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योग गुरु अनुसया मुनेश्वर, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ ऋतुजा मुंढे या होत्या. गायकवाड सर व चाळक सर यांनी योगा बद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशिल टकले सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रत्नमाला नानी मोटे, माधुरी कुरकुटे यांच्यासह जिजामाता योगा ग्रुपच्या महिलांचे सहकार्य लाभले.

# श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे मंगळवारी होणार पंढरपूरकडे प्रस्थान

भगवानगड । प्रतिनिधी







महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे मंगळवार दि.२४ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान मंगळवारी दुपारी ठीक ३ वाजता होणार आहे. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते.

दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहोचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, बोरकिन्ही ग्रामस्थ, भाग्येश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान छत्रपती संभाजीनगर-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, संत भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली निघणाऱ्या या भव्यदिव्य पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती राहणार आहे.



नेतृत्व ज्यांचे प्रेरणेचे दीपस्तंभ, शिक्षण क्षेत्राला लाभले नवे तेजस्वी मार्गदर्शक नवगण शिक्षण संस्थेच्या सचिवपदी डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांची निवड झाली. यानिमित्त अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना युवा नेते शरद बडगे, राम जाधव, पोलीस पाटील तुकाराम शहाणे, पत्रकार प्रा.शिवराज माने, मेंबर गणेश जाधव, दिगंबर गोंदवले, शहादेव माने, पवन बडगे यासह पाटोदा बेल येथील युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# धारूर तालुक्यात मनसे पदाधिकारी यांनी हिंदी विषयी पत्राचे मुख्याध्यापकांना दिले प्रत


धारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांच्या आदेशाचे पालन करत त्यांनी काढलेल्या पत्राची महाराष्ट्रभर पदाधिकारी कार्यकर्ते राज्यातील शाळेमध्ये प्रत देऊन हिंदी विषय मागणी रद्द करण्याची मागणी करत आहेत.



या पार्श्वभूमीवर धारूर येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मुख्याध्यापकांना इयत्ता १ ली पासुन हिंदी भाषा लादण्याच्या राज्य सरकारच्या कृती विरोधात राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील मुख्याध्यापकांना काढलेल्या पत्राची निवेदन प्रत २० जून शुक्रवार रोजी शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कसबा विभाग, जनता प्राथमिक विद्यालय कसबा विभाग, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडरवाडा, ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, यशोदीप पब्लिक स्कूल, श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल, जिल्हा परिषद केंद्रीय विद्यालय सह आदी शाळांच्या मुख्याध्यापकांना देऊन राज ठाकरे यांच्या भुमिकेला पाठींबा द्यावा अशी निवेदन देऊन मागणी केली.

ही मोहीम जिल्हाध्यक्ष श्रीरामजी बादाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मनसे तालुका अध्यक्ष प्रशांत शिनगारे पाटील, उपाध्यक्ष भरतराव इखे, सचिन घोडके, प्रतीक जोगदंड, शहराध्यक्ष निलेश शिनगारे, अतिश शुक्ला, राहुल बोराडे यांच्यासह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# मानवी हक्क अभियानच्या धारुर शहराध्यक्षपदी पवन डोईफोडे

धारुर । प्रतिनिधी

मानवी हक्क अभियान या सामाजिक संघटनेच्या धारुर शहर अध्यक्षपदी तरूण व सामाजिक कार्यकर्ता, सतत सक्रिय असणारे पवण डोईफोडे यांची निवड करण्यात आली आहे. मानवी हक्क अभियान या सामाजिक संघटनेची तालुका बैठक विश्राम गृह धारुर येथे संपन्न झाली. या बैठकिला मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय अध्यक्ष व जे एन यु विद्यापिठ दिल्ली चे प्रोफेसर मा. मिलिंद नाना आवाड उपस्थित होते. या बैठकीत सध्या च्या सामाजिक, राजकीय व ईतर मुलभूत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तालुक्यातील भूमिहीन कुटुंबांनी उदरनिर्वाहासाठी कसत असलेल्या गायरान जमिनीवर शासनाकडून विविध प्रोजेक्ट करण्याचा जो घाट घातला आहे, त्या निर्णयाविरोधात तीव्रतेने लढा देवून त्या जमिनी कास्तकाऱ्यांच्या नावे करण्यात याव्यात यासाठी शासन, प्रशासन स्तरावर संघर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला. अनेक गावात स्मशानभूमीचा प्रश्न आहे, शिक्षण, पाणी, रोजगार, ऊसतोड कामगार यांचे प्रश्न आहेत, अन्याय अत्याचाराच्या घटना घडत आहेत.अशा विविध समस्या घेवून मानवी हक्क अभियानच्या वतीने संघर्ष करण्यासाठी ही चर्चा करण्यात आली.

बैठकीला बिड जिल्हा अध्यक्ष राजेश भाऊ क्षीरसागर, उपस्थित होते. त्यांनी संघटना वाढीसाठी पदाधिकारी यांनी प्रमाणिकपणे प्रयत्न करून कर्मवीर एकनाथ रावजी आवाड यांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी तन मन धनाने काम करावे असे मार्गदर्शन केले. यावेळी धारुर शहरातील धडाडीचे कार्यकर्ते पवन डोईफोडे यांची शहराध्यक्ष पदी निवड करण्यात आली. या बैठकीला विष्णू मुजमुले, बंडू लोखंडे, परमेश्वर अडागळे, महादेव उमाप यांच्या सह तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते, बैठकिचे नियोजन धारुर तालुका अध्यक्ष किसनदादा लोखंडे यांनी केले होते.

# सावध व्हा - बांबू लागवडीच्या व्यापक चळवळीची गरज : कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा भाई पटेल

गेवराई । प्रतिनिधी

पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. वातावरणात कार्बनचे प्रमाण वाढल्याने, मानवा पुढे भविष्यात अडचणी उभ्या राहतील. हे टाळायचे असेल तर, वेगाने वाढणाऱ्या झाडांचे संवर्धन करण्याची गरज आहे. बांबु लागवडीच्या माध्यमातून ग्रीन बेल्ट तयार करून, या चळवळीला तरूण शेतकर्यांनी व्यापक स्वरूप प्राप्त करून द्यावे. असे, आवाहन कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष, माजी आमदार पाशा भाई पटेल यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केले आहे. दरम्यान, बीड जिल्ह्याला मोठा गोदा काठ लाभलेला असून, त्या पट्ट्यात बांबू लागवडीला मोठी संधी असल्याचे निरिक्षण ही त्यांनी नांदविले आहे.



सामाजिक कार्यकर्ते तथा जय भवानी बॅन्केचे व्हा. चेअरमन स्व. बालाप्रसाद लोया यांच्या निवासस्थानी, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी, शनिवार ता. २१ रोजी सकाळी अकरा वाजता सांत्वनपर भेट दिली. बालाभाऊ लोया यांनी शेतकरी आंदोलनाच्या चळवळीत माझ्या सोबत काम केले. समाजा विषयी कळवळा असलेला एक सहकारी गेल्याचे सांगून, त्यांनी आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर, पाशा पटेल यांनी पत्रकारांशी संवाद साधून, बांबू शेती लागवडीच्या लागवडीच्या संदर्भात भाष्य केले. वातावरणात प्रतिकूल बदल होऊ लागलेत. त्याचे दुष्परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत आहेत. कार्बन च्या वाढत्या प्रमाणामुळे ऑक्सिजनच अडचणीत आला आहे. ही चिंतेची बाब असून, नव्या पिढीच्या भविष्यासाठी झाडांचे संवर्धन आवश्यक आहे. बांबू शेती हा अंत्यत महत्त्वाचा आणि शेतकर्यांच्या हिताचा विषय आहे.

बांबूची शेती करण्यासाठी सरकार मदत करायला तयार आहे. शेतकरी बांबू शेती कडे वळला पाहिजे. त्यातून, शेतकर्यांना आर्थिक सुबत्ता येईल आणि पर्यावरण संवर्धन करता येईल. त्यासाठी, बांबू शेतीच्या लागवडीची आवश्यकता आहे. बीड जिल्ह्यात मोठा गोदा काठ आहे. या परिसरात बांबू शेतीला चांगली संधी आहे. बांबू पासून अत्यावश्यक गोष्टी तयार होतात. इथेनॉल, कपडे, इ. वस्तू बांबू पासून तयार करता येतील आणि कार्बनचे प्रमाण ही कमी होईल. दरम्यान, पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. वातावरणात कार्बनचे प्रमाण वाढल्याने, मानवा पुढे भविष्यात अडचणी उभ्या राहतील. हे टाळायचे असेल तर, वेगाने वाढणाऱ्या झाडांचे संवर्धन करण्याची गरज आहे. बांबु लागवडीच्या माध्यमातून ग्रीन बेल्ट तयार व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या चळवळीला तरूण शेतकर्यांनी व्यापक स्वरूप प्राप्त करून द्यावे. असे, आवाहन कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष, माजी आमदार पाशा भाई पटेल यांनी शेवटी बोलताना केले आहे.




# आमचा महसूल चालतो मग आम्हाला रस्ता का नाही?

## आझाद क्रांती सेनेचा सरकाला सवाल

माजलगाव । प्रतिनिधी

खामगांव पंढरपूर महामार्गाजवळ जायकोचीवाडी फाटा येथे आज दि.२१ जून २५ रोजी सकाळी १० वाजता आझाद क्रांती सेनेच्या वतिने न्याय मागण्या साठी भव्य रस्तारोको करण्यात आला.

आम्हाला प्यायला स्वच्छ पाणी का नाही ? आमच्या गावच्या शाळेला दर्जेदार शिक्षण का नाही ? शेतकऱ्यांना कर्जमाफी का नाही. गेली ३५ वर्षापासून जायकोचीवाडीचा रस्ता अद्यापपर्यंत झालेला नाही. शाळेतील विद्यार्थी, अबलावृद्ध, गर्भवती महिला, यांच्यासह गावकऱ्यांना दळणवळणासाठी रस्ता नसल्यामूळे नागरिकांमध्ये चिड निर्मान झाली असून रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. रस्त्याचे काम तात्काळ सुरू न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन आझाद क्रांती सेनेच्या वतीने करण्यात येईल, असा इशारा याप्रसंगी देण्यात आला.

या आंदोलनामध्ये आझाद क्रांती सेना प्रमूख राजेशजी घोडे, ता.प्रमूख अशोक ढगे, किसन भिसे, उद्धव वाकणकर, अकाश हतागळे, राहूल गायकवाड, संजय हिवाळे, अरूण पिसूळे, भारत गायकवाड, गणेश कांबळे, पांडुरंग कांबळे, अशोक गायकवाड (मन्या), सुनील कांबळे, सुनील खंडागळे, सुरेश घोडे, बप्पा सुरवसे, दादाराव थोरात व समस्त गावकरी महिला यांची लक्षणीय उपस्थीती होते.

पान १ वरून...

### पोलीस निरीक्षक संदीप पाटील साहेब....

फिरत असतात. हे कोण पोलीस कर्मचारी आहेत यांची गोपनीय माहिती घेऊन निलंबित करण्याची मागणी होत आहे. चकलांबा पोलीस प्रशासनाच्या आर्थिक तडजोडीमुळे लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांना अजुन किती दिवस पाठीशी घालणार असा असाल उपस्थित केला जात आहे. काळ्या सोन्याच्या उपशातून लाखो रुपयांचा मलिंदा दोन पोलीस कर्मचारी गोळा करून पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या घशात घालत आहे. चकलांबा पोलिसांच्या हप्तेखोरीच्या कारभारामुळे अवैध वाळू उपसा करणारे मात्र आपले उखळ पांढरे करून घेत आहे. हप्तेखोरीमुळे वाळू माफियांकडून जमाने वाळू उपसा सुरू आहे. या हफ्तेखोरीची चर्चा आता तालुक्यात रंगू लागली आहे. हाताची घडी अन् तोंडावर बोट अशी भूमिका पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांची असल्यामुळे गोदापत्रात वाळू माफियांनी अक्षरशः मूलभूत घातला आहे. वाळू माफियांवर चकलांबा पोलिसांचा कोणताही अंकुश उरलेला नाही. त्यामुळे हा प्रकार वाळूमाफ्यात तसेच पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या अभद्र युतीमुळे सुरू आहे की काय? असा सवाल नागरिकातून केला जात आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी स्वत: या प्रकरणी चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

### वकिलाकडून महिलेला मारहाण?

रात्रीच्या वेळी त्यांच्या घरी जाऊन रामेश्वर आवळे यांना बाहेर घ्या असे बोलत होते. आवळे याच्या आई व पत्नी यांनी सांगितले ते घरी नाहीत. काही असेल आल्यावर बोलू असे सांगितले. तरी त्यांनी नसल्यामुळे दगडू रामभाऊ आवळे, पत्नी अशिंता आवळे, सून सुदर्शन आवळे यांना घरातून भायर घेऊन यांच्यावर बांबूच्या काठीने व लोखंडी पाईप याने जबर मारहाण केली. यात सोडण्यासाठी आलेले सुदर्शन यांचे वडील यांना देखील त्यांनी धक्काबुक्की केली. व यात वकील राम केरबा गवते यांनी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीने जातिवाद शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या झालेल्या मारहाणी मध्ये सुदर्शन आवळे यांना मुक्का मार तर अशिंता आवळे यांना डोक्यात जास्त मार लागल्याने गंभीर जखमी झाल्या आहेत. त्याच्यावर बीड येथील शासकीय रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. तर कुटुंब हे वकील रामा गवते यांनी दिलेल्या धमकीमुळे भयभीत झाले आहे.

### गैबीनगर तांडा येथे जुगार क्लबवर...

शेडचे बाजुला ऊसाचे शेतामध्ये पैश्याची बाजी लावुन हार जीत चा तिर्रट नावाचा जुगार खेळत आहेत. अशी माहीती प्राप्त झाली होती.यावरुन सदर ठिकाणी दोन पंचासमक्ष जावुन छापा टाकला असता सर ठिकाणी आठ इसम गोलाकर रिंगण करुन तिरट खेळताना दिसले. यातील एक इसम पोलीस पार्टीस पाहुन ऊसाचे शेतामध्ये पळुन गेला. उर्वरीत सात इसमांना ताब्यात घेतले. त्यांची नावे १) संभजी नाटकर रा.राक्षसभुवन २) किशोर प्रधान रा.धोंडराई ३) अनिल राठोड रा.ठाकरवाडी तांडा ४) पिकाजी राठोड रा.कुंभेजळगाव ५) संजय शिंदे रा.धोंडराई ६) रविंद्र कोठी रा.गेवराई ७) शेख जावेद रा. रा.राक्षसभुवन असे आहेत.सदर इसमांचे ताब्यातुन चार मोटार सायकल ,एक चार चाकी वाहन व १०८०० रोख रक्कम असा एकुण ०८ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदर सात इसमाविरुध्द पोलीस ठाणे चकलंबा येथे महाराष्ट्र जुगार कायदान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नवनित काँवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. शिवाजी बांटेवाड स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पोह/ महेश जोगदंड, राजु पठाण, राहुल शिंदे, पो शि/बप्पासाहेब घोडके, चालक गणेश मराडे यांनी मिळुन केलेली आहे.

### एपीआय दराडेनी मुरुमाची चोरटी...

ही कारवाई शनिवारी रात्री करण्यात आली आहे. पण या चारही चालकांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया आज दुपारी एक वाजेपर्यंत सुरू होती. एसटीच्या पथकामध्ये या अगोदर सुद्धा एपिया दराडे यांच्या नावाची दहशत होती दरड यांनी अनेक कारवाया केलेल्या आहेत यांनी केलेल्या कारवाया आज माफी यांचे कंबरडे मोडण्याचे प्रयत्न पोलीस अधिकारी त्यांच्याकडून आहे एपीएफ दराडे यांना पुन्हा एकदा पोलीस अधीक्षकांच्या बदकाचा प्रमुख करून त्यांच्यावरती जबाबदारी दिली पाहिजे दहशत माफियांमध्ये आहे आणि माफिया हा एपी या दराडे चे नाव ऐकलं की नको रे बाबा असं म्हणू लागतो मुरूम माफी यांवरती केलेली ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि बाळराजे दराडे, पोलीस हवालदार अतिश मोराळे, पोलीस नाईक नामदेव सानप, पोलीस शिपाई राठोड चालक पवार यांनी केली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणीला व्यवसायासाठी कर्ज देणार फक्त घोषणा; अमलात कधी येणार?

## सावता सेनेच्या विभागीय अध्यक्षा वर्षा शिंदेचा सरकारला सवाल

पाटोदा । प्रतिनिधी

महिलांच्या सशक्ती करणासाठी फडणवीस सरकारने मोठमोठ्या घोषणा केल्या, 'लाडकी बहिण' योजने अंतर्गत महिलांना व्यवसायासाठी एक लाख रुपय कर्ज देण्याचे आश्वासन दिले. मात्र आजपर्यंत ही योजना केवळ कागदावरच दिसते आहे. प्रत्यक्षात लाभ मिळाल्याचे चित्र अजून कुठेही दिसले नाही, अशी घणाघाती टीका सावता सेना महिला आघाडीच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ.वर्षा शिंदे यांनी केली.



त्या म्हणाल्या, सरकार 'लाडकी बहिण' म्हणून महिलांना ओळख देत आहे हे स्वागतार्ह आहे, पण त्या बहिणीला स्वत:चा व्यवसाय उभा करायचा असेल, तर कर्जाच्या नावाखाली फक्त आश्वासन देण्यात येत आहे. आर्थिक पाठबळ मिळाल्याशिवाय महिलांचे खरे सशक्तीकरण शक्य नाही. वर्षा शिंदे यांनी पुढे सांगितले की, अनेक महिला आजही सरकारी दारात हेलपाटे घालत आहेत.

बँकांमध्ये अर्ज घेतले जात नाहीत, अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केली जाते. त्यामुळे ही योजना प्रत्यक्षात राबवली जात आहे की नाही, यावर प्रश्नचिन्ह उभे राहते. त्यांनी सरकारला आवाहन केले की, योजना जाहीर केल्यानंतर तिला वेळेत आणि प्रभावीपणे अमलात आणणे हे सरकारचे कर्तव्य आहे. महिलांच्या अपेक्षांशी खेळू नये. अन्यथा सावता सेना महिला आघाडी रस्त्यावर उतरून आवाज उठवेल. असा इशारा सावता सेनेच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षा सौ. वर्षा शिंदे यांनी दिला आहे.



## ज्ञानधन विद्यार्थी सु–संस्कार केंद्रात विद्यार्थ्यांनी घेतले योगासनाचे धडे

बीड । प्रतिनिधी

अंकुश नगर भागातील ज्ञान धन विद्यार्थी सु–संस्कार केंद्रात आंतरराष्ट्रीय ११ वा योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. अध्यक्षस्थानी विनायक वझे तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिन कोटूळे हे होते. पुढे केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांना योगा या विषयावर विविध उदाहरणे देऊन योग आणि योगा येथील फरक सांगितला. तसेच अडीच हजार वर्षांपूर्वी योग चे गुरु पतंजली यांनी निरोगी जीवन जगण्यासाठी योग हा एकमेव पर्याय असून त्याचा लाभ विद्यार्थ्यांनो घ्यावा असे असे संबोधित करण्यात आले.

संचालक महादेव काळकुटे यांनी योगच्या माध्यमातून योगचे देशातच नाही तर देशाच्या बाहेर आपले नाव केले असे मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. राधा तांबे यांनी विद्यार्थ्यांकडून काही योगासने करून घेतले. तसेच आलेल्या सर्व योगशिक्षकांचा योगचा प्रसार आणि प्रचार करणाऱ्यांचा व योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा संचालक माधव काळकुटे व विकास गवते योग कोच यांच्या संकल्पनेतून सत्काराचा आयोजन देखील करण्यात आले. यावेळी योग शिक्षक निलेश लंके, रविंद्र शिनगारे, रामचंद्र ठोसर, बाबासाहेब कूडके, उद्धव लाड, रामकृष्ण राऊत, भारत ठोंबरे, फहीम इनामदार, कमलाकर माने, राधिका वझे, पुष्करणी वझे इत्यादी योग शिक्षकानी उपस्थित विद्यार्थ्यांना योग विषयी माहिती दिली.

### राष्ट्रीय महामार्गाच्या मंजुरीचे श्रेय घेणाऱ्या पुढाऱ्यांनी

## निकृष्ट दर्जाच्या रखडलेल्या गतवर्षी ४५९ तर यावर्षी ५ महिन्यांत १५७ अपघातात बळी गेलेल्यांची जबाबदारी घ्यावी : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्या आदेशानुसार २०२५–२६ च्या वार्षिक आराखड्यात बीड जिल्ह्यातील लातुर ते लोखंडी सावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव १८ किलोमीटर रस्त्यावरील उर्वरित लांबीचे चौपदीकरण आणि माजलगाव ते केज दरम्यान धारूर जवळच्या ब्लॅक स्पॉट ठरलेल्या घाट या दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटी रूपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. आम्हीच कामे केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी यांच्या कडुन मंजूर करून आणली म्हणत नितिनजी गडकरी यांचे आभार मानत माजी खासदार प्रितमताई मुंडे व विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनावणे यांची श्रेयवादासाठी दैनिकात पत्रकबाजी सुरू आहे.

मात्र याचवेळी गेल्या वर्षी २०२४ मध्ये अपघातात ४५९ जणांनी आपला जीव गमावला तर ३९७ जण गंभीर जखमी झाले होते. तर जानेवारी २०२५ ते मे



२०२५ या गेल्या ५ महिन्यात २५९ अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असून व १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे. निकृष्ट रस्ते, गुळगुळीत रस्त्यावरील गतिरोधकांचा अभाव, दिशादर्शक फलक नसणे आणि रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृतीच्या नावाखाली फोटो सेशन यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. जिल्ह्यातील महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट आहेत. याबाबतीत मात्र केवळ सामाजिक कार्यकर्ते यांनीच वारंवार प्रशासन व सरकारला निवेदन, आंदोलनाद्वारे जागे करण्याचा प्रयत्न केला असुन आज श्रेयवादासाठी धडपडणारे लोकप्रतिनिधी मुग गिळून गप्प होते त्यामुळे या अपघातांची जबाबदारी सुद्धा त्यांनी घ्यायला हवी अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.

**बीड जिल्ह्यातील महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट**

एखाद्या ठिकाणी वारंवार होणारे अपघात लक्षात ठेवुन तेथील रस्त्याची स्थिती आणि अपघाताचे कारण शोधून उपाययोजना केल्या जातात. या जीवघेण्या अपघात प्रवण स्थळांना ब्लॅंक पोट म्हणून निश्चित केले जाते. बीड जिल्ह्यात महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट ठरविण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे सिरसाळा, नित्रुड, नंदगाव डेअरी सायगाव ता.आंबेजोगाई) धारूर घाट, होळेश्वर विद्यालय, एचपी पेट्रोलपंप ते चंदनसावरगाव, सुडी पार्टी ते मांगवडगाव, लोखंडी सावरगाव, धामणगाव, वाघळूज, साबलखेड, पांढरी, पोखरी, चुंबळी फाटा, बामदळवाडी, मांजरसुंबा घाट, मंझेरी रोड, पाली, छत्रपती संभाजी महाराज चौक, पाडाशिंगी ब्रिज, रांजणी, गढी पूल, वडगाव ढोक, नायरा पंप गेवराई, बागपिंपळगाव, नागझरी सिरसदेवी शिवार, मादळमोही पेट्रोलपंप, सावरगाव, पांगर बावडी याठिकाणांचा समावेश आहे.

**निकृष्ट दर्जाच्या रस्ता प्रकरणी लोकप्रतिनिधी मुग गिळून गप्पच**

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावर गेल्यावर्षी जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान ४५९ जणांना अपघातात जीव गमवावा लागला असुन ३९७ जण गंभीर जखमी झाले आहेत तर यावर्षी जानेवारी २०२५ ते मे २०२५ दरम्यान २५९ अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असुन १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे. रस्त्यांची कामे ठरलेल्या कालावधीत पूर्ण न करता रखडलेले रस्ते, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे उद्घाटनापुर्वीच रस्त्याला तडे जाणे, मोठमोठ्या भेगा पडणे ज्यात वाहनांचे चाक अडकुन अपघात होणे, अपघात प्रवण स्थळी गतिरोधकांचा अभाव, महामार्गावर अनेक ठिकाणी वळणावर सुचना व दिशादर्शक फलकांचा अभाव व सिग्नल यंत्रणा नसणे आदी असुविधांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले. सामाजिक कार्यकर्ते यांनी यावेळी आवाज उठवला असताना लोकप्रतिनिधींनी मात्र याकडे दुर्लक्ष करत मुग गिळून गप्प बसल्याचे दिसून आले.यासंदर्भात आवाज उठवण्याचे टाळले. आत्ता मात्र स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरपरीषद निवडणुकांच्या तोंडावर श्रेयवादाची पत्रकबाजी सुरू असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

## पहाट फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार अँड. राज पाटील यांना जाहीर

बीड । प्रतिनिधी

अँड राज पाटील यांनी लढा दुष्काळीशी फाउंडेशनच्या माध्यमातून जिल्हाभरात लाखो झाडांचे वाटप करुन पर्यावरणाचे संतुलन राहण्याचे सामजीक कार्य करत आहेत. तिगाव दुष्काळमुक्त व टँकर मुक्त करण्यासाठी जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात केलेली आहेत, याच सामाजिक कार्याची दखल संभाजीनगर येथील पहाट फाउंडेशन घेतली आहे. त्यांना पहाट फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार जाहीर झाला असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन यांचा वर्ष होत आहे. पुरस्कार वितरण सोहळा २८ जून रोजी बुलढाणा येथे होणार आहे. वृक्षतोडीमुळे पर्यावरणाची मोठी हानी होत चाललेली आहे. यामध्ये वेळेवर पाऊस न आल्याने कठीन दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. सर्व मानवी जीवनाला जीवन जगण्यासाठी



ऑक्सिजनची मोठी आवश्यकता आहे. ऑक्सिजनची कमतरता झाली तर काय होऊ शकते, याची प्रचिती कोरोना काळामध्ये सर्वांना आलेली आहे. झाडे टिकली तरच मानव जिवन जगण शक्य आहे. पुढील धोका टाळण्यासाठी पृथ्वीचे संतुलन टिकून राहण्यासाठी झाडे लावने झाडे जगवने, पाणी आडवने पाणी जमीनीत मुरवने ही काळाची गरज ओळखुन अँड राज पाटील यांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून संपूर्ण बीड जिल्ह्यातील गावागावांमध्ये झाडांचे महत्त्व सांगत जिजाऊ फिरता जन्म उत्सवा साजरे केला यामध्ये वृक्षांची वाटप करून तेथील नागरिकांना ती झाडे जगविण्याची जिम्मेदारी दिली. मित्रपरिवारांच्या वाढदिवसानिमित्त व महापुरुषांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर घेणे व रक्तदात्यांना झाडांचे वाटप करणे, मराठा आरक्षण चळवळीमध्येही येणाऱ्या सर्व समाज बांधवांना वृक्षांचे वाटप केले. दर वर्षी संक्रातीला सरपंच सौ अर्चनाताई पाटील व राज पाटील या दाम्पत्याने महिलांना वाण म्हणून पुस्तक व झाडाचे वाटप केले.

तालुक्यातील १०८ जि.प. शाळेतील १०,००० हा विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, कोरोना काळात गरजूंना किराणा किट व औषधांचे वाटप, सांगली, कोल्हापूर महापूर ग्रस्तांना २ ट्रक उपयोगी साहित्य प्रत्यक्षात वाटप, गावातील शेती रस्ते १६ किलोमीटर स्वखर्चातून, तलाव गाळ मुक्त व नद्या खोलीकरण सरळीकरण, गावातील बेरोजगार युवकांना हार्वेस्टर ऑपरेटर ड्रायव्हर या माध्यमातून शंभर पेक्षा जास्त तरुनांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यामुळे तिगाव हे दुष्काळमुक्त व टँकर मुक्त होण्यास मदत होणार आहे.आदी कामाची दखल पहाट फाउंडेशन संभाजीनगर यांनी घेतली आहे. वृक्षमित्र लढा दुष्काळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राज पाटील यांना पहाट फाउंडेशन चा राज्यस्तरीय आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार जाहीर केला असून पुरस्कार वितरण सोहळा २८ जून रोजी बुलढाणा येथे होणार आहे. त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन वर्षाव होत आहे.

## सौभाग्याच्या लेण्यात भेसळ शुद्ध कुंकू कसे ओळखणार

आष्टी । प्रतिनिधी

पूर्वी महिला कपाळावर लावत असतात नैसर्गिक पद्धतीने तयार केल्या जाणाऱ्या कुंकाचे वापरामुळे त्वचेवर कोणते दुष्परिणाम होत नसत मात्र बदलत्या जीवनशैलीनुसार यामध्ये केमिकल्स हानिकारक रंगाचा वापर होऊ लागला आहे. हळदीपासून बनवलेले नैसर्गिक कुंकू त्वचेसाठी सुरक्षित मानले जाते. हळदीमध्ये एम्प्लॉयमेंटरी आणि एंटी एक्सीडेंट गुणधर्म असल्याने त्वचेसाठी फायदेशीर ठरते केमिकलुक्त पंकज वापर वाढल्याने ते शुद्ध की केमिकल युक्त हे कळत नसल्याने दररोज वापरात येते. त्यामुळे कपाळावर काळ डाग पडून कपाळाची जळजळ होते.

हलक्या कुंकवाने कपाळावरील त्वचेची जळजळ होणे खाज सुटणे असं अनेक प्रकारचे त्रास होतात व नैसर्गिक कुंकू भाग्यश्री ठरते. अलीकडच्या काळात कोणकोला मागणी वाढली असल्याने सोबत घेतली ना म्हणून ओळखले जाणारे कुंकाचा आतापर्यंत मोठ्या प्रमाणात वापर करत मात्र कुंकवात केमिकल हानिकारक रंगाचे प्रमाण वापरले जाते. महिला मोठ्या प्रमाणावर कुंकवाचा वापर करतात कोण असल्याने जरूर कपाळी लावली जाते बसून कुंकू बाजारात मिळत असल्याने स्वस्त पनायचं हवा.

रासायनिक युक्त कुंकू वापरल्यास त्वचेला एलर्जी जळजळ आणि त्वचारोग बदलण्यासारखे समस्या उद्भवू शकतात काही रसायनिक त्वचेसाठी हानिकारक असू शकतात ज्यामुळे दीर्घकालीन गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात त्यामुळे शक्यतो नैसर्गिक कुंकू वापरणे अधिक सुरक्षित असते.

**– डॉ. महेंद्र पटवा,** कडा

## भावी नगराध्यक्षांनो, दावेदारी करण्याआधी शहरात चक्कर मारा – जनतेचे हाल समजून घ्या, मगच निवडणुकीच्या गप्पा मारा!

### आझाद पत्रकार शेख इमरोज शरीफ यांचा थेट सवाल

बीड । प्रतिनिधी

बीड शहर सध्या एका भयंकर अवस्थेतून जात आहे. कुठेही पहा – रस्त्यांची चाळण झाली आहे, नाल्यांची सफाई नाही, पावसात गटारांचे पाणी थेट घरात घुसतेय, गल्लीबोळांत साचलेलं पाणी, कचऱ्याचे ढीग, आणि पिण्याच्या पाण्यासाठी महिनोंमहिने वाट पाहणारी जनता.वर्षानुवर्षे हीच परिस्थिती सुरू आहे आणि याचं ओझं आजही नागरिकांना दररोज सहन करावं लागतंय.



पण या सर्व त्रासदायक काळात, जे आज स्वतःला 'भावी नगराध्यक्ष' म्हणवून घेत आहेत – ते त्या वेळी नेमके कुठे होते? या नगराध्यक्ष पदाच्या दावेदारांपैकीः कुणी आंदोलन केलं का? कुणी मोर्चा काढला का? किमान एक साधं पत्रक सुद्धा काढलं का नागरिकांच्या समर्थनार्थ? काहीजण इमानदारीने जनतेत राहून काम करताना दिसले, पण बहुतांश लोक कुठेच दिसले नाहीत. जेव्हा जनता त्रस्त होती, तेव्हा हे सगळे गप्प होते – आणि आता निवडणुका आल्या की मोठमोठे दावे सुरू झालेत!

हेच 'भावी नगराध्यक्ष' एसी गाड्यांतून फिरतात, पण बीड शहरातील सर्वसामान्य जनतेचे काय हाल आहेत याची यांना जाण आहे का? बीड न्यूज आप तक या माध्यमामार्फत आम्ही लवकरच शहरातील सर्वच नगराध्यक्ष पदाचे उमेदवारांशी आम्ही थेट संवाद साधणार आहोत, आणि त्यांना जनतेच्या वतीने एकच स्पष्ट मागणी – निवडणुकीपूर्वी तुम्ही एकदा शहराच्या गल्लीबोळात चक्कर मारा! स्वतःच्या डोळ्यांनी पाहाः रस्त्यांची अवस्था काय आहे. नाल्यांचे पाणी घरात कसं घुसतंय, पाणीपुरवठा खंडित कसा आहे. कचऱ्याचे डोंगर का वाढत आहेत? अशा एक ना अनेक समस्येने बीडकर आज या गंभीर समस्यांमध्ये अडकले आहेत – मग याला जबाबदार कोण? जनतेने हे आता विचारायलाच हवं. जनतेला सुद्धा एक जागरूकतेचं आवाहन – तुम्ही अनेक वर्ष या समस्यांचा सामना करत आला आहात. आता स्वतःला विचारा –या नेत्यांनी त्या वेळी तुमच्यासाठी काय केलं? कोणीतरी आधार दिला का? सवलत मिळवून दिली का? एखादा पत्रक, मोर्चा तुमच्यासाठी घेतला का? जर नाही, तर मग विचार करा – अशा नेत्यांना तुम्ही तुमचं अमूल्य मत का द्यावं? उमेदवारांनो, लक्षात ठेवा जनतेला मूर्ख समजण्याची चूक करू नका! जनतेनेनेता कोण आहे हे न पाहता, तो कशासाठी उभा आहे आणि काय करू शकतो, यावरच मतदान करावे. – नाहीतर पुन्हा ह्याच समस्यांत अडकून राहावं लागेल! नंतर रडत बसण्यापेक्षा,आत्ताच जागे व्हा – विचार करा – आणि योग्य निर्णय घ्या! ही भूमिका आणि मागणी आझाद पत्रकार शेख इमरोज शरीफ यांनी एका ठाम प्रसिद्धी पत्रकाद्वारे मांडली आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हास्तरीय अधिवेशन १७ सप्टेंबरला होणार : स्वामी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे मराठवाडा विभागीय अधिवेशन नुकतेच ऐतिहासिक आणि यशस्वीरित्या संपन्न झाले.आता येणाऱ्या १७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये बीडचे पहिले जिल्हास्तरीय अधिवेशन २०२५ मध्ये घेण्याचे जिल्हास्तरीय बैठकीमध्ये निश्चित झाल्याचे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे.

बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे शनिवार दिनांक २१ जून २०२५ जागतिक योग दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा शाखेची बैठक मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाली. या बैठकीस बीडचे जिल्हाध्यक्ष अमजद खान, ग्रामीण जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, पत्रकार हल्ला



विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर यांच्यासह पत्रकार संघाचे जिल्हा सरचिटणीस शेख वसीम, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सरचिटणीस शेख अब्दुल, महिला जिल्हा सरचिटणीस प्रा. अनुप्रिता मोरे, जिल्हा उपाध्यक्ष शेख आयुब, जिल्हा संघटक रईस खान, गेवराईचे तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, केजचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजलगावचे मार्गदर्शक सुदर्शन स्वामी, पाटोदा तालुकाध्यक्ष अजिज शेख, वडवणीचे तालुकाध्यक्ष अशोक निपटे, ग्रामीणचे जिल्हा सरचिटणीस बालासाहेब फपाळ यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सर्वानुमते बीड जिल्ह्यातील पत्रकार संघाचे पहिले जिल्हास्तरीय अधिवेशन २०२५ हे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले. या जिल्हास्तरीय अधिवेशनामध्ये जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार, मंत्री, तसेच माजी आमदार, माजी खासदार, माजी मंत्री त्याचबरोबर प्रशासकीय अधिकारी आणि बीड जिल्ह्यातून इतर जिल्ह्यांमध्ये नावलौकिक मिळवलेल्या सर्व क्षेत्रातील मान्यवरांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्याचे निश्चित करण्यात आले. हे अधिवेशन नेत्रदीपक आणि ऐतिहासिक करण्याबाबत सर्वांनी एक मुखाने सहमती दिली. स्नेहभोजनाने जिल्हास्तरीय बैठकीची सांगता मोठ्या आनंदी आणि उत्साही वातावरणात करण्यात आली.

**अधिवेशनामध्ये पत्रकारांसह यशस्वी रत्नांचा होणार बीडचे रत्न या पुरस्काराने सन्मान...**

बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यातून माध्यमातून ११, त्याचबरोबर जिल्ह्यातून १ पेपर विक्रेता, १ पेपर लाईन वाटप करणारा, त्याचबरोबर विविध क्षेत्रांमध्ये नेत्र दीपक यशस्वी भरारी घेतलेल्या रत्नांचा बीडचे रत्न म्हणून सन्मान करण्यात येणार आहे.



## राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत जागतिक योग दिन साजरा

केज । प्रतिनिधी

दिनांक २१ जून २०२५ रोजी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्यासाठी योगाचे महत्व समजावून देण्या साठी स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज च्या राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत योगाभ्यास घेण्यात आला. यावेळी शाळेच्यामुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी. यांची प्रमुख उपस्थिती होती तर मार्गदर्शक म्हणून शाळेचे माजी शिक्षक श्री.एस.ए. डापकर यांची उपस्थिती होती.

यावेळी एस.ए. डापकर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले की, योगामुळे आपण निरोगी व दीर्घायुष्य जगू शकतो. आपल्या शरीर व मनाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी योग करणे खूप गरजेचे आहे. त्यामुळेच सर्व जगभर योगाचे महत्व अधोरेखित होत आहे. यावेळी विविध योगासने करण्यात आली. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

## बौद्धजन पंचायत समिती सभापती, आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली विनोद मोरे यांचा वाढदिवस व सेवानिवृत्ती समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न

बोरघर / माणगांव । प्रतिनिधी

बौद्धजन सेवा संघ, दापोली, मंडणगड–मुंबई, बौद्ध सेवा संघ, इलणे शाखा मुंबई, बौद्धजन पंचायत समिती, मध्यवर्ती यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धजन पंचायत समितीचे उपसभापती मा. विनोद सुदाम मोरे, मुक्काम गाव इलणे, ता. दापोली, जिल्हा रत्नागिरी यांची बॉम्बे हॉस्पिटलमधून सीनिअर टेक्निकल ऑफिसर म्हणून ३९ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर १८ जून २०२५ रोजी वयाच्या ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवानिवृत्ती आणि वाढदिवस असा दुहेरी कार्यक्रम इंदू मिलचे प्रणेते सरसेनानी बौद्धजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, मुंबई १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी महामानवांना पुष्पहार अर्पण करून मा. विनोद मोरे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी विशाखा मोरे यांनी ज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाला सुरवात केली तद्नंतर संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी सुमधुर व गोडवाणीने धार्मिक विधी पूर्ण करीत त्यांनी आपल्या पहाडी आवाजात, प्रभावी भाषाशैलीत कार्यक्रमाच्या सुत्रसंचालनाची धुरा सांभाळली. बौद्धजन पंचायत समितीचे कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत आणि सरचिटणीस राजेश घाडगे या दोघांनी अत्यंत लाघवी भाषाशैलीत विनोद मोरे यांच्या कार्याचा आढावा घेणारा लिखित



जीवनपट निर्माण केला तर मंगेश पवार यांनी त्या लिखित जीवनपटाचे वाचन सभागृहात करीत विनोद मोरे यांच्या कार्याचा लेखाजोखा मांडला, सदर कार्यक्रमात विनोद मोरे यांची आई सुरेखाताई मोरे, पत्नी विशाखा मोरे, तीन भाऊ, तीन मुले, सुना, नात असा मोठा परिवार सोबतच इलणेकर भावकी, विविध संघटना, बॉम्बे हॉस्पिटल कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात सभापती आनंदराज आंबेडकर बोलत असताना विनोद मोरे यांनी सदर ३९ वर्षांच्या सेवेत काय कमावलं तर त्यांनी माणसे कमावली, माणुसकी जपली, अनेकांना मदत केली, रोजगार दिले, रुग्णांची सेवा केली सोबतच सामाजिक, शैक्षणिक अश्या सर्व क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला, लहानपणी गावी शिक्षण घेत असता भावकीमध्ये चिटणीस पदापासून ते अध्यक्षपद त्यांनी भूषविले तसेच इलणे केंद्रात सरचिटणीस पदापासून अनेक उच्चपद तसेच बौद्धजन सेवा संघ तालुका दापोली, मंडणगड येथे सरचिटणीस, अध्यक्ष, सभापती अशी अनेक पद त्यांनी भूषविली सोबतच शैक्षणिक क्षेत्रात ही त्यानी उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे, बौद्धजन पंचायत समितीच्या इमारत बांधणीच्या कार्यात ही त्यांचे मोठे योगदान आहे, समितीच्या अगणित सभांचे नेतृत्व त्यांनी करीत आपली कणखर भूमिका मांडत जनमानसात जागृती निर्माण केली व स्मारकनिधीसाठी त्यांना प्रवृत्त केले. बौद्धजन पंचायत समितीमध्ये दाखल झाल्यापासून त्यांनी सरचिटणीस, उपकार्याध्यक्ष, उपसभापती असा कार्यभार प्रामाणिकपणे पार पाडला त्यांनी सच्चामनाने बौद्धजन पंचायत समितीवर प्रेम केलं व आपले योगदान दिले ते असेच पुढे रहावे व त्यांची साथ समितीला अशीच लाभत रहावी असे गौरवोद्गार काढून त्यांच्या अद्भुतपूर्व योगदानाबद्दल कृतघ्नता व्यक्त करीत त्यांच्या ५८ व्या वाढदिवसाच्या मंगलकामना देत पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तद्नंतर इलणे सेवा संघाचे अध्यक्ष मोरे साहेब, अनिल मोहिते, दिलीप रुके, विकासक महेंद्र कांबळे, गटप्रतिनिधी विकास गायकवाड, प्रकाश अहिरे, वंचीत बहुजन आघाडीचे मुंबई चिटणीस सरदार भाई, सम्यक कोकण कला संस्थेचे मंदार कवाडे व सहकारी, जयंती उत्सव मंडळाचे भागूराम पवार व सहकारी, बॉम्बे हॉस्पिटलचे त्यांचे सहकर्मचारी व जवळचे स्नेही संजीवनी यादव, जनार्दन मुरडकर, उपकार्याध्यक्ष एच. आर. पवार, अशोक कांबळे, दापोली मुंबई संघाचे सभापती महेंद्र चाफे, विनोद मोरे यांचे जवळचे स्नेही उमाकांत जाधव, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, महिला मंडळाच्या उपाध्यक्षा प्रमिलाताई मर्चंडे यांनी आपले विचार मांडीत विनोद मोरे यांना शुभेच्छा दिल्या, सदर कार्यक्रमास कार्यकारी मंडळाचे सर्वच विश्वस्त, सर्वच उपकार्याध्यक्ष, अतिरिक्त चिटणीस, चिटणीस, सर्वच व्यवस्थापक मंडळ, कार्यकारी मंडळ, आजी माजी सर्व कार्यकर्ते, महिला मंडळाच्या सुशीलाताई जाधव, आणि सहकारी, निवडणूक मंडळाचे मिलिंद जाधव आणि सहकारी, विवाह मंडळाचे रघुनाथ घाडगे, साळवी व सहकारी, संस्कार समितीचे मंगेश पवार, मनोहर बा. मोरे व सहकारी, पतपेढीचे किशोर मोरे व सहकारी व सर्वच समित्यांचे, शिवडी गटक्रमांक १३ चे माननीय कार्यकर्ते, विनोद मोरे यांचा गटक्रमांक ४३ चे कार्यकारिणी मंडळ आणि स्थानिक शाखा व स्थानिक शाखेचे अध्यक्ष दिनेश हाटे व सहकारी, बॉम्बे नेव्हल डॉक कर्मचारी, बॉम्बे हॉस्पिटल कर्मचारी विविध क्षेत्रातील विविध संघटनांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते लोकांनी अक्षरशः गर्दी केली होती ज्यामुळे हॉलही अपुरा पडला होता अनेकांना शुभेच्छापर विचार व्यक्त करण्यास वेळ देता आला नाही त्याबद्दल विनोद मोरे यांनी दिलगिरी व्यक्त केली, सरतेशेवटी प्रचंड गर्दी असूनही अक्षरशः पायऱ्यांवर उभे राहून ही कार्यक्रमास उपस्थिती दिली व अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने शांततेत कार्यक्रम पार पाडला त्यामुळे सदर कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने आभार मानून मंगेश पवार यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटींची कामे मंजूर

## खा.बजरंग सोनवणेंनी करून दाखविले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले सोनवणेंच्या पाठपुराव्याला पाठबळ

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय महामार्ग गेले असून वाहूतुकीच्या दृष्टीने माजलगाव ते केजमधील धारूर जवळचा घाट ब्लॅकस्पॉट ठरला होता. शिवाय लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्त्यातील उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची बाबही महत्वाची होती. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा केला आणि या पाठपुराव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठबळ देत ४२१ कोटींची ही दोन्ही कामे सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित केली आहेत.



राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८(सी) माजलगाव ते केजमधील धारुर जवळच्या घाट अरुंद असून चढ जास्त असल्यामुळे वारंवार अपघात होत होते, तसेच प्रवासात वेळ लागत होता. हा घाट ब्लॅकस्पॉट म्हणूनही जाहिर करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी धारुर घाटातील रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून थेटेगव्हाण मार्गे कमी चढाईचा व अधिक रुंदीचा चौपदरी रस्ता करण्यासाठी जुलै २४ पासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सतत पाठपुरावा केला. सन २५/२६ चा कृति आराखडा व वार्षिक नियोजनात सदरील काम घेण्यात आले असून या ११ कि.मी रस्त्यासाठी तब्बल १७१ कोटी रुपये खर्च प्रस्तावित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून धारुर घाटातील वाहतुक समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी होत होती. घाटामधे चढ जास्त असल्यामुळे जड वाहतुक लांबच्या मार्गाने करावी लागत होती. अरुंद रस्त्यामुळे घाटामधे अपघाताचे प्रमाण वाढले होते. हे काम पूर्ण झाल्यास शेगाव ते पंढरपूर रस्ता वाहतुक सुरळीत होईल. माजलगाव, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतुक सुलभ होणार आहे. या सोबतच लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्ता या उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. हे २५० कोटी रुपये अंदाजित किंमत असलेल्या १८ कि.मीचे काम सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित करण्यात आले असून दोन्ही कामे करण्यास उच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्गात येणारे अडथळे आणि महत्वाच्या विषयाकडे लक्ष घातलेले आहे. धारूर घाटातील ब्लॅकस्पॉटवर अनेकदा अपघात होवून बळी गेलेले आहेत. परिणामी, अनेक संसार उघड्यावर पडलेले आहेत. आता याठिकाणी पर्यायी मार्ग काढून येथील अपघात टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहे.

### या कामांसाठीही सुरू आहेत प्रयत्न

अहमदपूर ते पिंपळा धायगुडा, धायगुडा पिंपळा ते लोखंडी सावरगाव व लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे प्रस्ताव समितीकडून मंजुरी करुन घेऊन त्या कामांनाही प्राधान्याने मंजुरी घेण्यात येईल.

मंजुरी देण्यात आलेल्या दोन्ही कामाच्या निविदा लवकरच होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्याबद्दल मी जिल्ह्याच्या वतीने त्यांचे आभार मानतो.

–खा.बजरंग सोनवणे, बीड.

# धारुरच्या ऐतिहासिक किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरणासह सुशोभिकरण करा : सराफ

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहराचे ऐतिहासिक वैभव आसलेल्या किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण, मजबुतीकरण, रुंदीकरणासह सुशोभीकरण व अतिक्रमण हटवण्यासाठी विशाल सराफ यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे आमरण उपोषणाचा इशारा किल्ले धारूर शहराचे ऐतिहासिक वैभव असलेला महादुर्ग किल्ल्याकडे जाण्यासाठी कच्चा रस्ता असून सदर रस्ता पूर्णपणे खराब झालेला आहे तर रस्त्याच्या बाजूने येड्या बाभळीचे झुडपे वाढलेली आहेत.




सदर महादुर्ग किल्ल्याला भेट देण्यासाठी महाराष्ट्रासह बाहेरील राज्यातून पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात. सदर किल्ल्याकडे जाणारा रस्ता हा अरुंद असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वेड्या बाभळींच्या झाडांनी वेढलेला आहे. किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण, डांबरीकरण करून सुसज्ज रस्ता व सुशोभीकरण करण्यात यावा. यामध्ये प्रमुख मागण्या अशा की, रस्त्याच्या कडेने पथ दिवे लावण्यात यावे, गैरप्रकार होत असल्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे., मुख्य रस्ता मुख्य प्रवेशद्वार इथ पर्यंत बनविण्यात यावे., महादुर्ग किल्ल्याच्या मुख्य रस्त्यासह आजूबाजूने असलेले अतिक्रमण देखील काढण्यात यावे. यासह अनेक मागण्याचे निवेदन पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ता विशाल सराफ यांनी तहसिलदार यांना दिले आहे. निवेदनाची दखल नाही घेतल्यावर आमरण उपोषण करणार आसल्याचे निवेदात म्हटले आहे. यावेळी पत्रकार विशाल सराफ, कृष्णा जेदे, गुड्डु शेख, हनुमंत तोंडे, आकाश गायसमुद्रे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# अपात्र केलेल्या सरपंच, सदस्य यांना पात्र ठरवण्याच्या लढ्यास यश : दत्ता काकडे, प्रा.ईश्वर मुंडे

धारूर । प्रतिनिधी

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवणारे व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र अधिनियम २००४ तरतुदीनुसार एक वर्षात सादर करणे आवश्यक असते. सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूक मध्ये राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांनी जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच, सदस्यांना अपात्र ठरवण्यात आले होते. या अपात्रतेच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे यांनी आ.जयंत पाटील यांच्या कडे ही माहिती सादर केली होती. आ.जयंत पाटील यांनी विधानसभेत व सरपंच परिषद मुंबई यांच्या वतीने राज्याध्यक्ष दत्ता काकडे यांनी आ.श्रीकांत भारतीय यांच्या मार्फत विधान परिषदेत आवाज उठवला होता. तसेच ग्राम विकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या कडे पाठपुरावा केल्यानंतर यापुढे एक वर्षाची मुदत वाढ देण्याची घोषणा विधानसभेत केली होती.



त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दि.१ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर आदेशाच्या प्रारंभीच्या दिनांकापर्यंत घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या, सरपंचाच्या, सभासदाच्या अध्यक्षांच्या आणि सदस्यांच्या व सभापतीच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदतवाढ या आदेशाच्या दिनांकपासून बारा महिन्याची मुदत शासन राजपत्र दि. ३०/०४/२०२५ अन्वये देण्यात आली. त्यामुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच, सदस्यांना पात्र करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार या सरपंच व सदस्य यांनी आपला पदभार घेऊन कामकाज सुरू केले आहे. अखेर अपात्र ठरवलेल्या सरपंच सदस्य यांना पात्र करण्याच्या लढ्याला यश मिळाले, असे मत सरपंच परिषद मुंबई चे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे व राष्ट्रवादीचे नेते प्राध्यापक ईश्वर मुंडे यांनी व्यक्त करून या लढ्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले आहेत.

# मयत सुरेश जाधव यांच्या कुटुंबियांची बदामराव पंडित यांनी घेतली सांत्वन भेट

गेवराई । प्रतिनिधी

येथील छत्रपती मल्टीस्टेट मध्ये असलेल्या हक्काच्या ठेवीची रक्कम दोन वर्षापासून मागूनही परत न दिल्याने हतबल झालेल्या शेतकरी सुरेश आत्माराम जाधव यांनी पतसंस्थेच्या शाखेसमोरच आत्महत्या केली होती. यामुळे दुःखाचा डोंगर कोसळलेल्या जाधव कुटुंबीयांची माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी भेट घेत सांत्वन करत धीर दिला.



गेवराई येथील छत्रपती मल्टीस्टेट मध्ये नऊ लाख रुपये च्या ठेवी परत मिळाव्यात म्हणून खळेगाव येथील शेतकरी सुरेश आत्माराम जाधव हे गेल्या दोन वर्षापासून चकरा मारत होते. पंधरा दिवसांनी देतो, महिन्याने देतो असं म्हणत छत्रपती मल्टीस्टेटचे चेअरमन संतोष भंडारी आणि येथील व्यवस्थापक ज्योती क्षीरसागर यांनी त्यांना त्यांचेच पैसे देण्यासाठी टाळमटाळ केली. मुला मुलीच्या शिक्षणासाठी तात्काळ पैशाची गरज असल्याने सुरेश जाधव हे पत्नी कविता आणि मुलगा शुभम व मुलगी साक्षी यांच्यासह छत्रपती मल्टीस्टेटच्या गेवराई शाखेत ठाण मांडून बसले होते. आपल्या मागणीकडे कोणी लक्ष देत नाही, त्यासोबतच आपला वारंवार पैसे मागणी करताना होणारा अपमान सहन न झाल्याने अखेर दिनांक १८ जून २०२५ रोजी पहाटे तीन वाजता सुरेश जाधव यांनी गेवराई शाखेच्या समोर गळफास घेऊन आत्महत्या केली होती. यामुळे जाधव कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. घटनेच्या वेळी बाहेरगावी असलेल्या माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेवराईत येताच खळेगाव येथे जाऊन जाधव कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सात्वन केले. यावेळी सुरेश जाधव यांची मुलगी साक्षी आणि शुभम यांनी, आम्हाला आमचे पैसे तर मिळाले पाहिजेच पण आम्हाला न्याय द्या आणि चेअरमन संतोष भंडारी व व्यवस्थापक ज्योती क्षीरसागर यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी केली. यावेळी भाऊसाहेब माखले उज्वल सुतार यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

# आमदार सुरेश धस यांनी देवळाली पंचायत समिती गणनातून अण्णासाहेब शिरसाट उमेदवारी द्यावी : कार्यकर्त्याची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

थोड्याच दिवसात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीचे बिगुल वाजणार आहे. प्रत्येक इच्छुक आपलं नशीब आजमावण्यासाठी नेत्यत्याकडे उमेदवारीची मागणी करत असतानाच अरणविहरि व तागडखेल गावचे सरपंच अण्णासाहेब शिरसाठ यांनी आमच्या पिंपरी घाटातील कार्यकर्त्यांची संवाद साधत असताना बोलताना सांगितले की, जर आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी मला देवळाली पंचायत समिती गणातून उमेदवारी दिली तर मी नक्कीच संधीच सोनं करेल असे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केली.



ते सामाजिक शैक्षणिक धार्मिक व विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करत गावाला विकासाची गंगा आणली आहे. गाव सुजलाम सुफलाम व्हावे हीच त्यांचा हेतू आहे तरी त्यांना यावेळी आमदार सुरेश धस यांनी देवळाली पंचायत समिती गणनातून उमेदवारी द्यावी अशी मागणी सचिन गव्हाणे, संतोष शिंदे, संदीप शिंदे (माजी ग्रामपंचाय सदस्य), भागवत शिरसाठ, नंदू गव्हाणे, सुधीर शिंदे, शौकत पठाण, सुरेश कांबळे जनहित लोकशाही पार्टी बीड जिल्हा अध्यक्ष आदींनी केली. नुकतेच पिंपरी घाटा येथील दौऱ्या दरम्यान नागरिकांनाशी संवाद साधताना बोलत होते. आजपर्यंत आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून अण्णासाहेब सिरसाठ यानी अरणविहरा ग्रामपंचायत च्या माध्यमातून विविध विकास कामे करून जनतेला आपली वेगळी ओळख करून दिली आहे. कामे करताना ना नफा ना तोटा या तत्त्वावर त्यांनी आजपर्यंत गावातील कामे केली व गावचा विकास हेच माझे ध्येय असं समजून ते आजपर्यंत आपल्या कारकिर्दीत काम करत आहेत. त्यांचा देवळाली पंचायत समिती गणात जनसंपर्क असल्याने त्यांना उमेदवारी दिल्यास यश निश्चित मानले जाते ते आमदार सुरेश धस यांचे खंदे समर्थक असल्याने आमदार धस यांनी त्यांचा विचार करावा अशी मागणी आता कार्यकर्त्यातून होत आहे.

# चौसाळा शहराच्या उपसरपंचावर येणार अविश्वासचा ठराव

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा ग्रामपंचायतीचे उपसरपंच अंकुश कळासे यांच्यावर सरपंच मंगल लोढा यांच्यासह १२ सदस्यांनी अविश्वास ठराव दाखल केला आहे. दरम्यान उपसरपंच कळासे यांनी आपण लवकरच राजीनामा देणार असल्याचे स्पष्ट केले आहे. चौसाळा शहराच्या सरपंच मंगल लोढा याच्यासह १२ सदस्यांनी उपसरपंच कळासे यांच्या विरोधात अविश्वास ठराव दाखल केला आहे. ग्रामपंचायतीमध्ये एक वर्षानंतर इतर सदस्याला उपसरपंच पदाची संधी देण्याचा सर्वानुमते निर्णय झाला होता. मात्र दोन वर्षे होऊनही उपसरपंचानी पदाचा राजीनामा दिला नसल्यामुळे त्यांच्यावर अविश्वास ठराव दाखल करावा लागल्याचे सरपंचानी सांगितले आहे.

# संचमान्यतेच्या नावाखाली जिल्ह्यातील मराठी शाळा बंद पाडण्याचा प्रशासनाचा डाव : रानबा गायकवाड

परळी वै. । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य कुटुंबातील हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असलेल्या बीड जिल्ह्यातील अनेक माध्यमिक शाळांचा संच मान्यता ० दाखवून सदरील शाळा संचमान्यतेच्या नावाखाली बंद पाडण्याचा प्रशासनाचा डाव असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केली आहे.

तसेच जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी मराठी प्रेमी नागरिकनी प्रशासनाचा डाव आणून पाडण्याचे आव्हान त्यांनी केले आहे. याबाबत प्रतिदिस दिलेल्या पत्रकात रामबा गायकवाड यांनी म्हटले आहे की, राज्य सरकारच्या मराठी शाळांचा उदासीन धोरणामुळे आणि इंग्रजी प्रेमापोटी जिल्हा परिषदेच्या आणि मराठी शाळा बंद पाडत आहेत तर राज्यातील अनेक शाळा उद्योगांच्या घशात घातले आहेत.

त्यामुळे सर्वसामान्यना शिक्षण घेणे अवघड होणार आहे. जिल्ह्यात पटसंख्या चे कारण पुढे करून सुमारे २० पेक्षा अधिक हायस्कूल शाळांचे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने ० पटसंख्या दाखवून संच मान्यता दिलेली नाही. तर इयत्ता ९ आणि १० वीसाठी एक ही शिक्षक मान्यता नाही यामुळे आता १६ तारखेपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असताना अतिरिक्त शिक्षकांचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. शिवाजी या भागात शाळा सुरू आहेत तेथील मुलांच्या शिक्षणावर ही गंभीर परिणाम होणार आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य लक्षात घेऊन बीड जिल्हा परिषद व शिक्षण विभागाने तात्काळ संच मान्यता द्यावी अन्यथा याप्रकरणी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रामबा गायकवाड यांनी दिला आहे.

# आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित सहभागी व्हावे

बीड । प्रतिनिधी

विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्प्याचे अनुदानासाठी निधीची तरतूद उपलब्ध करून द्या या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने दिनांक ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी व आपल्या हक्काचा टप्पा वाढीचा निधी पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे.



बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे आवाहन

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला होता. दरम्यान निवडणुका होऊन पुन्हा शिवसेना भाजपाचे सरकार सत्तेत आले. या मागणीसाठी विनाअनुदानित शिक्षकांसाठी कार्यरत असणारी मातृ संघटना महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीने ५ जून पासून मुंबई शहरातील आझाद मैदान येथे आंदोलन सुरू केले आहे. आज आंदोलनाचा १८ वा दिवस आहे.

या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्दड (मोटे), बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जिल्हा कार्याध्यक्ष प्रताप पवार, उपाध्यक्ष रामदास जामकर, उपाध्यक्ष अरविंद सौंदलकर, जिल्हा सचिव शेख, जिल्हा संघटक प्रताप देशमुख, जिल्हा सहसंघटक बाळासाहेब नागरगोजे, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे, महिला सचिव सुरेखा गायकवाड, बीड तालुका अध्यक्ष भागवत यादव, गेवराई तालुका अध्यक्ष दीपक गरूड, आष्टी तालुका अध्यक्ष रविंद्र भुकन, पाटोदा तालुका अध्यक्ष अंकुश गवळी, शिरूर तालुका अध्यक्ष दशरथ साबळे, माजलगाव तालुका अध्यक्ष चंद्रशेखर तौर, वडवणी तालुका अध्यक्ष वैजनाथ शिंदे, परळी तालुका अध्यक्ष गोविंद आघाव, धारूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर मुंडे यांच्यासह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

# लोखंडी सावरगाव ते बर्दापूर महामार्गाचे होणार चौपदरीकरण!

## वार्षिक आराखड्यात समावेश; केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी केली वचनपूर्ती

## लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा रस्ता चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्याचेही आदेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहराजवळून जाणारा ५४८ बी हा महामार्गावरील बर्दापूर ते लोखंडी सावरगाव या टप्प्याचे चौपदरीकरण करण्याचे आ. नमिता मुंदडा यांच्या प्रचारसभेत दिलेले वचन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पूर्ण केले आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक आराखड्यात या मार्गाच्या चौपदरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.



अंबाजोगाई आणि लातूरला जोडणाऱ्या ५४८ बी या महामार्गावर बर्दापूरच्या पुढे येताच चार पदरी रस्त्याचे अचानक दोन पदरीत रूपांतर होते. या ठिकाणी येणाऱ्या वाहनांच्या गतीचा अचानक अडथळा होत असल्यामुळे याठिकाणी वारंवार गंभीर अपघात घडत आले आहेत. अनेक निष्पाप नागरिकांचे जीव या अपुऱ्या आणि असुरक्षित रस्त्यामुळे गेले आहेत. त्यामुळे या मार्गाचे चौपदरीकरण करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने केली जात होती.

माजी खासदार प्रीतमताई मुंडे आणि अंबाजोगाईच्या आमदार नमिता मुंदडा यांनी ही नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे वारंवार मागणी केली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान अंबाजोगाई येथे झालेल्या आ. नमिता मुंदडा प्रचारसभेत गडकरी यांनी या प्रकल्पासाठी सहा महिन्यांत निर्णय घेण्याचे जाहीर आश्वासन दिले होते.

त्यानंतरही आमदार नमिता मुंदडा यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या काळात गडकरी यांची भेट घेऊन पुन्हा एकदा हा मुद्दा सविस्तर मांडला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले असून रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांनी २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात लोखंडी सावरगाव ते बर्दापूर या महामार्गाच्या १८ किमी लांबीच्या टप्प्याच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतरीत्या केला आहे. या कामासाठी सुमारे २५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे बर्दापूरच्या पुढे अचानक दोन पदरी होणाऱ्या रस्त्यामुळे निर्माण होणाऱ्या अपघातांची साखळी खंडीत होईल. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना आता सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास अनुभवता येणार आहे. या निर्णयाबद्दल आमदार नमिता मुंदडा यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानले असून हा निर्णय प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या निर्णयाबद्दल नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्याचे काम नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

**मांजरसुंबापर्यंत रस्ता चौपदरीकरणासाठी प्रयत्न सुरू : आ. नमिता मुंदडा**

सध्या दोन पदरी असलेल्या लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या मार्गाचेही चौपदरीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे आदेश मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याचे आ. मुंदडा यांनी सांगितले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT